2018-19

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

UGC Approved Journal No. 40705 University Grants Commission

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

November -2018

SPECIAL ISSUE LXXIII,( B)

# Samiksha



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Principal
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
November 2018

# मानुषतेचा सिद्धान्त

प्रा. डॉ. विजय रैवतकर
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी जि. गडचिरोली

ललित वाङ्मयकृतीच्या सौंदर्याचे व्यवच्छेदक लक्षण कोणते किंवा ललित वाङ्मयकृतीची श्रेष्ठता कशावरून सिद्ध करायची याची चर्चा मुक्तिबोध सातत्याने करतात. हे करीत असताना मुक्तिबोधांनी कलाकृतीच्या संदर्भात व्यवच्छेदक लक्षण सांगण्यात आलेल्या 'रस'तत्त्वाच्या अनुषंगाने मानवी जीवन गतिमान असल्याने ललित साहित्यकृतीचे दर्शन केवळ रसरूपाने घेतल्या जाऊ शकत नाही. रसतत्त्व मान्य करण्यासाठी सामंतवर्गीय पुमर्थनिष्ठा आणि अध्यात्मशास्त्रही मानावे लागते. आधुनिक साहित्यकृतीची वैशिष्ट्ये सांगण्यासाठी आणि तिचे मूल्यमापन करण्यासाठी रससिद्धान्त निरुपयोगी आहे. 'लय'तत्त्व या सिद्धान्ताच्या अनुषंगाने संवाद, विरोध आणि समतोल यांच्या रचनेवर लयसिद्धान्त आधारित असल्याने तो केवळ आकृतिवादी आणि बाह्य रचनेचा विचार करणारा अपुरा सिद्धान्त आहे. साहित्यकृतीमधील मूल्यात्म संदर्भ लयतत्त्वाला मान्य नाही. ललित साहित्याला लयसिद्धान्त लागू होत नाही. संगीतकला व चित्रकला यांच्या सौंदर्यकल्पनेसाठी आणि आकलनासाठी लयतत्त्व उपयोगी पडते. संवेदनानुभवाचे घटक आणि त्यामधील परस्पर संबंध यांचा अनुभव आणि भावार्थाचे घटक व त्यामधील गुणात्मक भेद लयसिद्धान्तात लक्षात घेतला जात नाही असा प्रतिवाद करून 'मानुषता' या मूल्यतत्त्वाची मांडणी केली आहे. मुक्तिबोधांना 'मानुषता' हे जीवनन्यायसंवादी मूल्यात्म सिद्धान्त ललित वाङ्मयकृतीचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारे आवश्यक असे तत्त्व वाटते.

'मानुषता' म्हणजे सामाजिक मानवाचे आंतरिक असणे (essence) होय, असे मुक्तिबोध सांगतात आणि परिवर्तनशील सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान 'मानुषता' हे आहे असेही ते स्पष्ट करतात. सामाजिक मूल्यात्म जीवन ही मानवी व्यवहाराची अस्तित्ववादी एक बाजू असते तर 'मानुषता' ही त्याची दुसरी बाजू असते. कोणत्याही समाजात जीवन हे वर्गयुक्त असेच असते. त्या त्या काळातील त्या त्या समाजजीवनाची मूल्येदेखील वर्गाधिष्ठित असतात. निसर्गाशी संघर्ष करीतकरीतच मानवाने आपला विकास घडवून आणला आहे. ज्या वर्गात व्यक्ती जन्मते वा वाढते त्या वर्गातील मूल्यव्यवस्थेचे संस्कार तिच्यावर झालेले असतात. म्हणजे सामाजिक मूल्यात्म जीवन व्यक्तीला घडवत असते. वर्गीय मूल्यांच्या चौकटीत जीवन जगत असताना व्यक्ती आंतरिक मानुषतेला मूरड घालीत असते. वर्गीय मूल्ये आणि शाश्वत मूल्ये यात भेद असतो. वर्गीय मूल्ये ही समाजाच्या विशिष्ट वर्गाचीच मूल्ये असतात व ती स्थलकालसमाजसापेक्ष मूल्ये असतात. उलट 'मानुषता' हे शाश्वत म्हणजेच कालपरिस्थितीनिरपेक्ष मूल्य आहे, असे मुक्तिबोध स्पष्ट करतात.

मानवी जीवनातील सामाजिक मूल्यात्मकता हा एक परिवर्तनशील असा पैलू आहे; पण मानवी अस्तित्वातील शाश्वत असा दुसरा पैलू आहे तो म्हणजे 'मानुषता' हा होय. ''या मानवी समाजाची पहिली प्रक्रिया निसर्गाशी द्वंद्व साधीत घडत जाण्याची प्रक्रिया आहे तर दुसरी निसर्गाशी आंतरिक एकात्मता स्थापित असतेपणाची (being) अनुभूती आहे. एक



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli